# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

## मराठी विभाग सन २०२४ -२५ बी.ए.भाग- ३ सत्र ५

## अभ्यसपत्रिका क्रमांक ०९ मराठी वाङ्मयाचा इतिहास - प्रश्न पेढी

**प्रश्न-१ योग्य पर्याय निवडा.**

१) खळोव्यासांची दीक्षागुरू कोण?

अ) महदाइसा

ब) कामाइसा

क) बहिणाई

**ड) हिरांबिका**

२) नरेंद्रच्या मूळ रूक्मिणी स्वयंवराची ओवीसंख्या किती?

अ) १०००

**ब) १८००**

क) १५००

ड) १९००

३) महानुभावीयांचे पवित्र धर्मक्षेत्र आणि तीर्थक्षेत्र कोणते आहे?

अ) रामटेक

ब) सातारा

**क) ऋद्धिपूर**

ड) देवगिरी

४) महानुभावांचे आचारधर्म व तत्वज्ञान प्रामुख्याने कोणत्या ग्रंथातून विषद झाले आहे?

**अ) सूत्रपाठ**

च) लीळाचरित्र

क) स्मृतिस्थळ

ड) श्रीगोविंदप्रभुचरित्र

५) नरेंद्रच्या उपलब्ध रूक्मिणी स्वयंवराची ओवी संख्या किती आहे?

अ) ७८९

**ब) ८७९**

क) ९८९

ड) १०८९

६) महानुभावांनी श्रीकृष्णप्रमाणे कोणाला पूर्वावतार मानले आहे?

अ) विठ्ठलाला

ब) रामाला

**क) श्रीदत्तात्रयाला**

ड) हनुमानाला

७) एकादशस्कंधावरील मराठीतील पहिले भाष्य असणारा ग्रंथ कोणता ?

अ) विवेकसिंधू

ब) ज्ञानेश्वरी

**क) उद्धवगीता**

ड) वच्छाहरण

VCCK- प्रा. जांभेकर व्ही. आय.

८) ज्ञानप्रबोधाचे साम्य कोणत्या गंथाशी आहे?

अ) सह्याद्रिवर्णन

ब) वच्छाहरण

**क) ज्ञानेश्वरी**

ड) रूक्मिणी स्वयंवर

९) दृष्टांतपाठ या ग्रंथाचे लेखक कोण?

अ) म्हाइंभट्ट

**ब) केसोबास**

क) नरेंद्र

ड) भास्करभट्ट

१०) श्री चक्रधराचे मूळ नाव काय?

अ) चांगदेव

**ब) हरपाळदेव**

क) सहदेव

ड) म्हाइंभट

११) 'वच्छाहरण' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

**अ) दामोदरपंडित**

ब) पंडित विश्वनाथ

क) खळोव्यास

ड) नारायणपंडित

१२) महानुभाव पंथातील तीसरे आचार्य कोण आहेत?

अ) नरेंद्र

**ब) भास्करभट्ट बोरीकर**

क) दामोदर पंडित

ड) नारायण पंडित

१३) कवी नरेंद्र हा कोणता राजाच्या दरबारी राजकवी होता?

अ) रामदेवराव कुलकर्णी

ब) रामदेवराव देशमुख

क) रामदेवराव भोसले

**ड) रामदेवराव यादव**

१४) 'सूत्रपाठ' या ग्रंथात एकूण किती सूत्रे सांगितली आहेत ?

अ) १२५०

ब) १३५०

**क) १२५५**

ड) १३५५

१५) लीळाचरित्रातून कोणाच्या आठवणी संकलित केल्या आहेत ?

**अ) श्री चक्रधर स्वामी**

ब) श्री गोविंदप्रभू

क) नागदेवाचार्य

ड) खेइंभट्ट

VCCK- प्रा. आंबेकर व्ही. आय.

१६) 'माझा मराठाचि बोलू कवतिये। परि अमृतातेही पैजा जिंके।' असा मराठीचा गौरव कोणी केला आहे.

अ) नामदेव

**ब) ज्ञानदेव**

क) गोरा कुंभार

ड) चोखा मेळा

१७) 'आदि, समाधी आणि तीर्थावळी' अशा तीन प्रकरणात ज्ञानदेवांचे चरित्र कोणी लिहिले आहे?

अ) सावंता माळी

ब) चोखा मेळा

क) सेना महाराज

**ड) नामदेव**

१८) सावंता माळी यांचा जन्म कोठे झाला आहे?

अ) बांदुगडे

ब) मंगळवेढा

**क) अरणभेंडी**

ड) नरसी-बामणी

१९) 'गोरा जुनाट पै जुना। हाती थापटणे अनुभवाचे' असे गोरोबा कुंभाराविषयी गौरवोद्गार कोणी काढले आहेत ?

**अ) नामदेव**

ब) ज्ञानदेव

क) सेना महाराज

ड) नरहरी सोनार

२०) ताटीच्या अभंगांची रचना कोणी केली आहे?

अ) जनाबाई

ब) नामदेव

**क) मुक्ताबाई**

ड) ज्ञानदेव

२१) 'जाता पंढरीसी सुख वाटे जीवा। आनंदे केशवा भेटतचि।' ही अभंगरचना कोणाची आहे?

अ) ज्ञानदेव

ब) नामदेव

**क) सेना महाराज**

ड) नरहरी सोनार

२२) विठ्ठलाच्या साक्षात्काराने कोणाच्या मनातील शैव-वैष्णव हा भेदाभेद संपून गेला?

**अ) नरहरी सोनार**

ब) सेना महाराज

क) चोखा मेळा

ड) नामदेव

२३) 'उस डोंगा परि रस नोहे डोंगा। काय भूललासि वरलिया रंगा।' हा प्रसिध्द अभंग कोणाचा आहे?

**अ) चोखा मेळा**

ब) सावंता माळी

क) गोरोबा कुंभार

ड) नरहरी सोनार

VCCK- प्रा. ओंबकरी व्ही. आय.

२४) 'संत वाटिकेतील जाईची वेल' असा कोणाचा उल्लेख केला जातो?

अ) मुक्ताबाई

**ब) जनाबाई**

क) कान्होपात्रा

ड) सोयराबाई

२५) 'नको देवराया अंत आता पाहू। प्राण हा सर्वथा फुटो पाहे।' असा विठ्ठलाचा धावा कोणी केला आहे?

अ) मुक्ताबाई

ब) जनाबाई

क) सोयराबाई

**ड) कान्होपात्रा**

२६) नाथ संप्रदायास अन्य कोणत्या सांप्रदयाने ओळखले जाते?

**अ. अवधूत सांप्रदाय**

ब. वारकरी सांप्रदाय

क. महानुभाव सांप्रदाय

ड. चोंभा सांप्रदाय

२७) सत्यमलनाथांना कोणत्या संताचा अनुग्रह होता?

अ. नामदेवांचा

**ब. ज्ञानेश्वरांचा**

क. एकनाथांचा

ड. तुकारामांचा

२८). लिंगायत संप्रदायामध्ये शिवयोग शिवाचार्य यांनी कोणता संस्कृत ग्रंथ लिहिला आहे?

अ. विवेकसिंधू

ब. दमयंतीस्वंयवर

**क. सिध्दान्तशिखमणि**

ड. यापैकी नाही

२९) मन्मथस्वामी यांच्या नावावर २४६ ओव्यांचे कोणते अपूर्ण काव्य आढळते.

अ. नित्यानंद

ब. केवलानांद

क. काव्यानंद

**ड. अनुभवानंद**

३०) कोणत्या मानवतावादी तत्त्वावर जैन संप्रदायाचे तत्त्वज्ञान उभारलेले आहे?

**अ. जगा आणि जगू द्या**

ब. खरा तो एकची धर्म

क. संताची शिकवण

ड. वाचाल तर वाचाल

३१) मराठी वाङ्मयाचा वैभवशाली प्रारंभ कोणाच्या कारकिर्दीत झाला?

**अ) देवगिरीचे यावदराजे**

ब) राष्ट्रकुट राजे

क) शालिवाहन राजे

ड) बहामनी राजे

VCCK- प्रा. ओंबकरी व्ही. आय.

३२) मराठीतील आद्यग्रंथ कोणता?

**अ) विवेकसिंधू**

ब) लीळाचरित्र

क) स्मृतिस्थळ

ड) ज्ञानेश्वरी

३३) श्रवणबेळगोळच्या शिलालेखाचा शके कोणता ?

**अ) शके ९०५**

ब) शके ११५०

क) शके १०५०

ड) शके ११५०

३४) 'विवेकसिंधू' हा ग्रंथ कधी लिहिला गेला?

अ) शके १९९०

**ब) शके १११०**

क) शके १०५०

ड) शके १२१०

३५) 'कुवलयमाला' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

अ) राजशेखर

ब) सोमेश्वर

**क) उद्योतनसुरी**

ड) हेमाड पंडित

३६) हेमांडपंतांनी कोणता ग्रंथ लिहिला ?

**अ) चतुवर्ग चिंतामणी**

ब) विवेकसिंधू

क) मानसोल्लास

ड) कुवलयमाला

३७) मराठीतील पहिले वाक्य कोणते?

**अ) श्रीचामुण्डराजे करवियले**

ब) महंत राष्ट्र म्हणोनि महाराष्ट्र

क) यांपैकी नाही

ड) वरील दोन्ही

३८) 'कर्पूर मंजरी' हे नाटक कोणाचे?

**अ) राजशेखर**

ब) सोमेश्वर

क) मुकुंदराज

ड) उद्योतनसुरि

३९) 'मानसोल्लास' हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) राजशेखर

क) मुकुंदराज

**क) सोमेश्वर**

ड) उद्योतनसुरि

VCCK- प्रा. आंबेकर व्ही. आय.

४०) धवळे म्हणजे काय ?

**अ) लग्नात गावयाचे वराविषयक गीत**

ब) लग्नात गावयाचे वधूविषयक गीत

क) लग्नात गावयाचे सासूविषयक गीत

ड) लग्नात गावयाचे सासऱ्याविषयक गीत

**प्रश्न-२ अंतर्गत विकल्पासह दीर्घोत्तर प्रश्न.**

१) महानुभावीय गद्य वाङ्मयाच्या आधारे १३ व्या शतकातील सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीचा आढावा घ्या.

२) महानुभाव संप्रदायांत निर्माण झालेल्या गद्य ग्रंथांचा परिचय करून द्या.

३) साती ग्रंथाची माहिती सविस्तर लिहा..

४) महानुभावियांच्या चरित्रग्रंथांची माहिती लिहा.

५) महानुभावीयांच्या पद्य वाङ्मय स्वरूप व विशेष लिहा.

६) विवेकसिंधू पूर्वकालीन रचनांचा आढावा घ्या.

७) मुकुंदराजांच्या वाङ्मयीन कामगिरीचा आढावा घ्या.

८) मराठीतील कथाकाव्य लेखन करणारी पहिली स्त्री म्हणून महदाइसेच्या काव्यग्रंथाआधारे तिची ओळख पटवा.

९) गतिमानता, सहजसुंदरता आणि स्त्रीसुलभता हे महंदबेच्या कवित्वाचे विशेष आहेत. या विधानाचीसत्यता तिच्या काव्याआधारे पटवा.

१०) महदंबेच्या धवळयांचा थोडक्यात परिचय करुन द्या.

११) इ.स. १४०० ते इ.स. १५०० या कालखंडातील अन्य सांप्रदायातील प्रमुख ग्रंथसारांचा परिचय करून द्या

१२) नाथ सांप्रदायाची ओळख करून सत्यमलनाथ व चोंभा यांचे वाङ्मयीन मूल्यमापन करा.

१३) जैन सांप्रदायाचे मराठी वाङ्मयातील योगदान स्पष्ट करा.

१४) 'दासोपंत हे मराठी भाषेमध्ये सर्वाधिक लेखन करून मराठी संत साहित्याचा प्रवाह समृद्ध करण्यामध्ये भरीव योगदान देणारे संतकवी होते' या विधानाचा परामर्श द्या.

१५) मुस्लिम सांप्रदायाचा परिचय करून हुसेन अंबरखान यांचे वाङ्मयीन योगदान स्पष्ट करा.

१६) वारकरी संप्रदायातील प्रमुख आणि सर्वश्रेष्ठ संतकवी म्हणून ज्ञानेश्वरांच्या काव्यकर्तृत्त्वाचा परिचय करून घ्या ?

१७) 'ज्ञानेश्वरांच्या काव्यात भक्ती आणि तत्त्वज्ञान यांचा सुंदर मिलाफ झाला आहे!' या विधानाचा परामर्श घ्या ?

१८) 'नामदेवांचे काव्य ईश्वरनिष्ठा जोपासणारे, ईश्वरतत्त्वाशी संवाद साधणारे आणि ईश्वराशी एकरूप होण्याची इच्छा बाळगणारे आहे' या विधानाची साधार चर्चा करा?

१९) वारकरी संप्रदायाचे कुशल संघटक, प्रसारक व संवर्धक म्हणून नामदेवांच्या सर्वांगिण कामगिरीचा आढावा घ्या ?

२०) कवित्त्व आणि तत्त्वज्ञानाने भारलेल्या ज्ञानदेवांच्या वाङ्मयीन कामगिरीचा आढावा घ्या?

**प्रश्न-३ अंतर्गत विकल्पासह लघुत्तरी प्रश्न.**

१) 'लीळाचरित्र' व 'श्री गोविंदप्रभुचरित्र' या ग्रंथांचा परिचय करून द्या?

२) 'सूत्रपाठ' व 'मूर्तिप्रकाश' या ग्रंथांची माहिती लिहा?

३) 'सह्याद्रिवर्णन' व 'श्री ऋद्धिपूरवर्णन' ग्रंथातील विषयविवेचन करा

४) भास्करभट्ट बोरीकर यांनी लिहिलेल्या ग्रंथाचा आढावा घ्या.

५) विवेकसिंधू या ग्रंथाचा थोडक्यात परिचय करून द्या.

६) जैन सांप्रदायाचा थोडक्यात परिचय करून द्या.

VCCK-प्रा. औंबेकरी ढी. आय.

७)दत्त सांप्रदाय व नागेश सांप्रदायाचे वाङ्मयीन मूल्यमापन करा.
८) ख्रिस्ती सांप्रदायाची थोडक्यात ओळख करून द्या.
९) नाथ सांप्रदायाचा थोडक्यात परिचय करून द्या.
१०) लिंगायत सांप्रदायाचे वेगळेपण सांगा.
११) सांवता माळी यांच्या अभंगरचनेचा थोडक्यात आढावा घ्या?
१२) संत मुक्ताईचे मराठी कवितेतील योगदान थोडक्यात स्पष्ट करा?
१३) नरहरी सोनार यांच्या अभंगरचनेचा थोडक्यात परिचय करून घ्या?
१४) चोखामेळांची वाङ्मयीन कामगिरी थोडक्यात विशद करा?
१५) जनाबाईंच्या काव्याचे विशेष थोडक्यात सांगा?

**प्रश्न-४ टिपा लिहा (चार पैकी दोन).**

१) लीळाचरित्र
२) सूत्रपाठ
३) रूक्मिणी स्वयंवर
४) श्री गोविंदप्रभुचरित्र
५) विवेक सिंधू
६) परमामृत
७) पवनविजय
८) मातृकी रूक्मिणीस्वयंवर
९) धवळे उत्तरार्ध
१०) धवळे पूर्वार्ध
११) शांतलिंग
१२) फादर स्टिफन्स
१३) जिनदासनामा
१४) बहिराजातवेद
१५) संत मुक्ताबाई
१६) संत चोखामेळा
१७) हरिपाठाचे अभंग
१८) अमृतानुभव

VCCK- प्रा. ओंबकरी व्ही. आय.